# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

क्र : मविनिआ/माअअ/42/2018/ 127 दि.03.08.2018

प्रति,
श्री. दामोदर पारिक,
नवजीवन कॉलनी, मु.पो. ता. वैजापूर,
जिल्हा- औरंगाबाद- ४२३ ७०१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दिनांक ११.०७.२०१८ रोजीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) अन्वये आयोगाच्या कार्यालयास दि. १३.०७.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद परिमंडळासाठी ग्राहक गा-हाणी निवारण मंचावर दि. 29 ऑक्टोबर 2012 ते 28 ऑक्टोबर 2014, दि. 30 जानेवारी 2015 ते 29 जानेवारी 2018 आणि 21 फेब्रुवारी 2018 ते 20 फेब्रुवारी 2020 पर्यंत ग्राहक प्रतिनिधींची जी निवड प्रक्रिया झाली असेल त्या निवड प्रक्रियेच्या मुख पृष्ठापासून ते मल पृष्ठापर्यंत (संपूर्ण) संचिकेची प्रत देण्यात यावी. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. या दस्तऐवजामध्ये एकूण 393 पृष्ठे आहेत |

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ३९३ | २ | ७८६/- | अंदाजे रु.३००/- | १०८६/- |
| | | | एकूण रु. १०८६ | **१०८६ /-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

सदर दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासु,

(प्रदिप मोहरे)

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी